# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.10.2025** **वारःगुरूवार**

1. देशभरात दीपावली पाडवा, बलीप्रतिपदा, गोवर्धन पूजा मोठ्या उत्साहात साजरे
2. वन संरक्षणासाठीच्या जागतिक क्रमवारीत भारत नवव्या स्थानावर
3. ज्येष्ठ अंतराळशास्त्रज्ञ, डॉक्टर एकनाथ चिटणीस यांचं पुण्यात निधन आणि
4. महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत-न्यूझीलंड तर पुरुष संघांमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध आज दुसरा सामना

**<u>पाडवा दिवाळी</u>**

दिवाळीच्या पर्वानिमित्त राज्यासह देशभरात काल कार्तिक शुद्ध प्रतिप्रदा म्हणजेच बलिप्रतिपदा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पती-पत्नीच्या स्नेहार्द्र नात्याचा उत्सव दिवाळी पाडव्याचा सणदेखील अत्यंत आनंदाने साजरा करण्यात आला. साडे तीनमुहूर्तांपैकी एक असलेल्या या मुहूर्तावर गृहखरेदी, नवीन वस्तू तसंच सोने-चांदी खरेदी या निमित्तानं बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण होतं. दिवाळी पहाट कार्यक्रमांमध्ये लोक उत्साहात सहभागी झाले. आज भाऊबीजेनं दिपावली पर्वाची सांगता होत आहे.

**<u>सांगली</u>** जिल्ह्यात दीपावली पाडव्यानिमित्त वाहन आणि इलेक्ट्रिक वस्तू खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केली होती. **<u>कोल्हापूर</u>** इथं गुळाचे सौदे पार पडले. क्विंटलला 4500 रुपये दर मिळाला.

**<u>भंडारा</u>** जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यात जांभोरा-पालोरा इथं गोवर्धन पूजेची अनोखी प्रथा पाळली जाते. मागील 150 वर्षांपासून परतेकी कुटुंबाच्या प्रमुखाच्या अंगावरून गावातील गोधन सोडलं जातं. परंतु, त्यांना शारीरिक इजा होत नाही अशी श्रद्धा आहे. तत्पूर्वी ढाल जागणे या कार्यक्रमात गाईंच्या मालकाच्या घरी जाऊन बोजरा मागितली जाते आणि त्या घरातील सुहासिनीकडून ढालीचं पूजन केलं जातं तसंच गावातील कोणत्याही जनावरांवर रोगराई येऊ नये म्हणून ग्रामदेवतेला साकडं घातलं जातं.

**<u>उत्तर भारतात</u>** गोवर्धन पूजन मोठ्या उत्साहात करण्यात आलं. **<u>उत्तराखंड</u>**मधल्या उत्तरकाशी इथल्या गंगोत्री धामचे पवित्र दरवाजे काल सकाळी अन्नकुट उत्सवानिमित्त हिवाळ्यासाठी बंद करण्यात आले. झेंडूच्या फुलांनी सजवलेल्या या मंदिराला यावर्षी साडे सात लाखांहून अधिक भाविकांनी भेट दिली.

**<u>अमेरिकेचे</u>** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये दीप प्रज्वलन करून दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. ट्रंप यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दूरध्वनीवरुन शुभेच्छा दिल्या. मोदी यांनी दिवाळीच्या शुभेच्छांसाठी तसंच दीपोत्सवानिमित्त दूरध्वनीवरून साधलेल्या संपर्काबद्दल ट्रंप यांचे आभार व्यक्त केले.

पंतप्रधानांनी भारत आणि अमेरिका यांच्या दरम्यान असलेल्या शाश्वत भागीदारीच्या ताकदीवर भर दिला आणि दहशतवादाला तोंड देणं आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देणं यासाठी भारताच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार करत दिव्यांच्या सणानिमित्त दोन्ही राष्ट्रांची लोकशाही जगाला आशेचा किरण देत प्रकाशित करत राहू आणि दहशतवादाविरोधात एकजूट होऊन उभे राहू असं मोदी यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>वनक्षेत्र</u>**

भारतानं वन संरक्षणासाठीच्या जागतिक क्रमवारीत एक पायरी वर चढत नववा क्रमांक मिळवला आहे. इंडोनेशियात बाली इथं अन्न आणि कृषी संघटनेनं जागतिक वन साधनस्त्रोत मूल्यांकन 2025 क्रमवारी जाहीर केली. सर्वाधिक वनक्षेत्र विकसित करणाऱ्या देशांना या क्रमवारीत स्थान दिलं जातं. गेल्या वर्षी या क्रमवारीत भारताला दहावा क्रमांक मिळाला होता. यंदा त्यात सुधारणा झाल्याची माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी दिली आहे. वन संरक्षण, वनीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशानं सरकारनं सुरू केलेल्या विविध उपक्रमांचं हे यश असल्याचं यादव म्हणाले.

**<u>नवीकरणीय ऊर्जा</u>**

देशाची नवीकरणीय ऊर्जा क्षमता 2014 मध्ये 35 गिगावॅट्स होती, ती आता पाचपटींनी वाढून 197 गिगावॅट्सवर पोहोचली आहे. यात मोठ्या जलऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण झालेल्या ऊर्जेचा समावेश नाही. 2030 पर्यंत जीवाश्मेतर ऊर्जा क्षमता 500 गिगावॅट्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट असल्याचं नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>आदि कर्मयोगी- गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यात आदि कर्मयोगी योजनेअंतर्गत 553 गावांमध्ये कृती कार्यक्रम तयार करुन आजवर साधलेल्या प्रगतीबद्दल जिल्ह्याचा नुकताच राष्ट्रीय पुरस्कारानं गौरव करण्यात आला. या गावांमध्ये आदिसेवा केंद्रं स्थापित केली आहेत. ही यंत्रणा नेमकी कशी कार्य करते याबाबत जिल्हाधिकारी अविशांत पांडा यांनी आकाशवाणीला माहिती दिली...

**व्हिलेज एक्शन प्लॅन तयार करताना सर्व फिल्ड ऑफिसर्स आहे ते एकत्रित जाऊन तिथे असलेले एस एसजी शिक्षक आदिवासी समाजाचे मोठे पदाधिकारी आहेत सगळे लोक एकत्रित काय काय आवश्यक आहे. गावस्तरावर कुठल्या प्रकारचे डिमांड्स साकारणे अपेक्षित आहे लाईन डिपार्टमेंट्सकडून कोणत्या कोणत्या योजना अजूनही गॅप्स आहेत. त्याच्याबाबतीत चिंतन शिबीर ठेवण्यात आलं आणि त्याच्या आधारे तिथे व्हिलेज ॲक्शन प्लॅन पण तयार करण्यात आलं याच्या व्यतिरिक्त आदी सेवा केंद्र जे आहे. ते ग्रामस्तरावर कशा लोकांच्या अडचणी कशा सोडवता येईल तिथे स्पोर्ट्स किंवा बाकी कल्चरल ॲक्टिव्हिटीज कसं करता येईल चर्चा करण्यात आली आणि आता आधी सेवा केंद्र पुढे जाऊन ते एक इन्स्टिट्यूशन म्हणून प्रत्येक ठिकाणी तिथे काम करणार जेणेकरून आधी सेवा केंद्र आणि जे आपलं सीएससी केंद्र आहे ग्रामपंचायत स्तरावर त्याच्यामध्ये एक प्रकारची सिनर्जी आहे पुढे जाऊन पण आधी कर्मयोगीमध्ये आणखी प्लॅन्स कसं चांगलं करता येईल आणखी काय काय सुधार अपेक्षित आहे. ग्रामस्तरावर त्याच्यासाठी जिल्हा पण कटिबद्ध राहणार.**

**<u>पुणे सायकल</u>**

पुढील वर्षी जानेवारीत नियोजित पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धेच्या निमित्तानं सायकलींचं शहर म्हणून पुणे शहराची ओळख पुन्हा निर्माण होणार आहे. त्या अनुषंगानं शहरामध्ये 75 किलोमीटरचे सायकल मार्ग तयार करण्याचं नियोजन आहे. परंतु सध्या पुण्यात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे आहेत. त्यामुळं सायकल ट्रॅक तयार करण्यासोबत रस्तेही खड्डेमुक्त करावेत अशी मागणी सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे. याबाबत आकाशवाणीशी बोलताना विवेक वेलणकर म्हणाले.....

**पुणे महापालिका अनेक रस्ते गुळगुळीत करून सायकल ट्रॅक करून एका आंतरराष्ट्रीय स्पर्धेचं आयोजन करते आहे. याबद्दल आम्हाला आनंदच आहे. प्रश्न एवढाच आहे. नागरिकांना आज जे खड्ड्यात रस्ते का, रस्त्यात गड्डे हा प्रश्न पडलाय आहे ते खड्डे कधी बुजवणार कसे बुजवणार क्वालिटीने बुजवणार का ? ते परत परत उखडणार नाहीत ना याची काळजी घेणार का ? आज जे रस्तोरस्ती त्या खड्ड्यांमुळे पडलेली खडी आहे, त्याच्यावरनं लोकं घसरून पडतायेत एक्सिडेंट होतायेत ते सगळं स्वच्छ होणार का थांबणार का? या प्रश्नांची उत्तरं खरं म्हणजे आज नागरिकांसाठी सगळ्यात जास्त महत्त्वाची आहेत आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरवताना त्या आलेल्या पाहुण्यांना आम्ही नक्की काय दाखवणार आहोत हे याच्यामागचा एक महत्त्वाचा विषय आहे त्यामुळे आमची महापालिका आयुक्तांकडे अतिशय स्पष्ट शब्दात मागणी आहे की**

**पहिल्यांदा शहरातले सगळे रस्ते हे निदान खड्डेमुक्त करा. कुठल्याही प्रकारची खडी त्याच्यावर असू नये एवढीच इच्छा आहे.**

**जाजू-अमरावती**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट देवून आकाशवाणी, दूरदर्शनच्या तसंच पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. अमरावतीजवळ बडनेरा इथं भारतीय जनसंचार संस्थानच्या प्रस्तावित इमारतीचं काम 2027 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जाजू यांनी दिले. मनपा आयुक्तांच्या निवासस्थानी एका बैठकीत त्यांनी यासंदर्भात आढावा घेतला.

**नाम-लातूर**

लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नाम फाऊंडेशन तर्फे रब्बी हंगामासाठी हरभरा आणि ज्वारीच्या बियाण्यांचे वाटप करण्यात आलं आहे. देवणी तालुक्यातील धनेगाव इथून याची सुरुवात करण्यात आली. अतिवृष्टी आणि पुरामुळे खचलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभारी देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं नाम फाउंडेशनकडून सांगण्यात आलं.

**चिटणीस निधन**

ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, डॉक्टर एकनाथ चिटणीस यांचं काल पुण्यात निधन झालं. ते 100 वर्षांचे होते. इस्रोच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. डॉक्टर होमी भाभा यांच्यासह भारतीय अवकाश कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश होतो. देशातला इन्सॅट हा पहिला दूरसंचार उपग्रह तयार करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. श्रीहरीकोटा आणि थुंबा इथल्या प्रक्षेपण केंद्राची जागा निवडण्यात त्यांनी पुढाकार घेतला. 1970 च्या दशकापासून त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळं 19990 च्या दशकात देशात खेडोपाडी दूरचित्रवाणी पोहोचवता आली. उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**क्रिकेट**

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धा आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून भारतीय संघाचा आज मुंबईत न्यूझीलंडविरुद्ध सामना होणार आहे. दोन्ही संघांसाठी सामना अतिशय महत्वाचा आहे. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका आधीच अंतिम चार फेरीसाठी पात्र ठरले असून आजच्या सामन्यातून चौथ्या स्थानावरील संघ ठरणार आहे. दोन्ही संघांचे गुण समान असून सरस धावगतीत भारत न्यूझीलंडपेक्षा पुढे आहे.

भारतीय पुरुष संघाचा आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध पन्नास षटकांचा दूसरा सामना आज ॲडलेड इथं होणार आहे. तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकून यजमान ऑस्ट्रेलिया आघाडीवर आहे. विराट कोहलीनं या मैदानावर प्रत्येक सामन्यात शतक झळकावलं आहे. भारतीय संघ इथं 15 सामने खेळला असून त्यापैकी नऊ जिंकले आहेत आणि पाच गमावले आहेत.

**हवामान**

जळगाव शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश भागात काल संध्याकाळनंतर वादळी वाऱ्यांसह दमदार पाऊस पडल्यामुळं शेतात काढून ठेवलेला मका, सोयाबीन आणि इतर पिकं पाण्यात गेली. कोकण, दक्षिणमध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.